H&RA™
WESTERN INDIA
Estd : 1951

# हॉटेल व्यावसायिकांची मतदानाला प्रोत्साहनासाठी 'प्लेज टू व्होट' मोहीम

। मुंबई : हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन (एचआरएडब्ल्यूआय)ने निवडणुकांमध्ये मतदार जागरूकता वाढवणे आणि सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी सक्रिय पाऊल उचलले आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत मतदान करून नागरिकांना त्यांच्या लोकशाही हक्कांचा वापर करण्यासाठी प्रेरित करणे, हा या संघटनेचा उपक्रम 'प्लेज टू व्होट' मोहिमेचा उद्देश आहे. मोहिमेचा एक भाग म्हणून, एचआरएडब्ल्यूआयने पश्चिम भागातील आपल्या सदस्यांकरिता एक परिपत्रक जारी केले आहे, ज्यामध्ये त्यांना मतदारांच्या सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी ग्राहक आणि समुदायांना सक्रियपणे सहभागी करण्याचे आवाहन केले आहे.

प्रमुख शिफारशींपैकी एक म्हणजे त्यांच्या संबंधित मतदारसंघांमध्ये रेस्टॉरंट परिसरात मतदानाचा दिवस दर्शवणारे फलक प्रदर्शित करणे. या उपक्रमाचा उद्देश लोकांना मतदानाच्या निर्धारित दिवशी मतदान करून त्यांचे नागरी कर्तव्य पार पाडण्याची आठवण करून देणे आणि प्रोत्साहित करणे, हा आहे.

यासंदर्भात एचआरएडब्ल्यूआयचे अध्यक्ष प्रदीप शेट्टी म्हणाले की, मतदान हा मूलभूत अधिकार असून प्रत्येक नागरिकासाठी लोकशाही प्रक्रियेत योगदान देण्याचा एक प्रभावी मार्ग आहे. 'प्लेज टू व्होट' मोहिमेद्वारे, सर्व पार्श्वभूमीच्या नागरिकांमध्ये या अधिकाराचा वापर करण्यासाठी जबाबदारी आणि अभिमानाची भावना निर्माण करणे, हे एचआरएडब्ल्यूआयचे उद्दिष्ट आहे. आम्ही असेही सूचवले आहे की, फलक लावण्याव्यतिरिक्त, बोटावर असलेली अमीट शाईची खूण दर्शवणाऱ्या, ज्यांनी मतदान केले आहे त्या ग्राहकांना खाद्यपदार्थांच्या बिलांवर विशेष सूट सदस्य आस्थापनांनी द्यावी. या स्वरूपाच्या उपक्रमातून केवळ मतदानाला प्रोत्साहन मिळणार नाही तर नागरी जबाबदारी तसेच सहभागाचा संदेश देखील बळकट होईल. आम्ही सदस्यांना सूचना, अपडेट्स आणि लोकांना मतदान करण्याचे आवाहन करणारी पोस्टर-स्मरणपत्रे सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करून सक्रियपणे सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करतो. व्यापक जनतेपर्यंत पोहोचण्यात आणि मतदारांच्या सहभागाचा संदेश वाढवण्यात डिजिटल वाहिन्यांचा लाभ घेणे महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. नागरी सहभाग आणि सामाजिक जबाबदारीला प्रोत्साहन देण्याच्या एचआरएडब्ल्यूआयच्या ध्येयाच्या अनुषंगाने, ही मोहीम लोकशाही सहभागाचे महत्त्व देण्यात सामूहिक आवाजांचा प्रभाव अधोरेखित करते. आम्ही सर्व पात्र मतदारांना विनंती करतो की, त्यांनी निवडणुकीच्या तारखा आणि उमेदवारांबद्दल माहिती ठेवावी, असेही शेट्टी यांनी सांगितले.